महानमानव

# नामदार गोखले

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय बा.वा.
दा.क्र. ३८७



# नामदार गोखले

लेखक

**मो. मा. वाळिंबे**

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
वा. क्र. 388 दिनांक .......
विषय ...बा. वा.... क्र. .........

BVBK-0:00387

किमत एक रुपया

प्रकाशकीय–

किशोरांसाठी विविध मनोरंजक उद्बोधक पुस्तके प्रकाशित करण्याचा संकल्प आहे. आजपर्यंत प्रकाशित झालेली पुस्तके किशोरांना फारच आवडली.

"नामदार गोपाळ कृष्ण गोखले" हे असेच उद्‌बोधक आणि संस्कारक्षमपुस्तक किशोर मित्रांना खासच आवडेल. संस्कारक्षम बालमनावर मनोरंजनाद्वारे संस्कार म्हणजेच उत्तम पुस्तके. त्यासाठीच प्रत्येकाने आमचीं प्रकाशनें संग्रही ठेवावीत.

------


प्रकाशिका :
सौ. निर्मला नारायण अरगडे
सौ. मालिनी माधव कुलकर्णी
अरगडे कुलकर्णी प्रकाशन
६/२२४ लोकमान्यनगर, पुणे ३०

प्रथमावृत्ती : १५ ऑगस्ट १९६९
पुर्नमुद्रण जून १९७८

चित्रकार : र. स. कंटक

मुद्रक
श्री. प्रभाकर सरदेसाई
अक्षर मुद्रणालय
६० ब्रह्मणपुर वलवण, लोणावळा


( सर्व हक्क प्रकाशिकेच्या स्वाधीन )

---


: प्राप्तीस्थान :

अरगडे आणि मंडळी
अप्पा बळवंत चौक,
पुणे ३०

श्री. माधव कुलकर्णी
२४३ बद्रिकाश्रम,
१ली खेतवाडी, गिरगाव, मुंबई–४

# २. नामदार गोखले

## विद्येचा वारकरी

मुलांनो, म. गांधींचे नाव तुम्हाला सर्वांना ठाऊक असेलच! भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामाचे थोर सेनानी, सत्याचे व अहिंसेचे कट्टे पुरस्कर्ते आणि निर्भयतेचे व शांततेचे मूर्तिमंत प्रतीक म्हणून भारतातले सारे आबालवृद्ध स्त्री-पुरुष त्यांना आदराने वंदन करतात. पण या म. गांधींचे गुरू कोण होते, माहीत आहे तुम्हाला?

म. गांधींच्या गुरूचे नाव आहे गोपाळ कृष्ण गोखले. नामदार गोखले किंवा भारतसेवक गोखले या नावाने ते प्रसिद्ध आहेत. नामदार या शद्बापेक्षाही भारतसेवक या शद्बानेच गोखल्यांचे यथार्थ वर्णन करता येते. गोखले खरोखरीच भारतसेवक होते.

रत्नागिरी जिल्ह्यातल्या कोतळूक नामक एका छोटयाशा गावी, दि. ९ मे १८६६ रोजी आपल्या आजोळी गोखले जन्माला आले. वाटोळी मुद्रा, गोरापान वर्ण व बाळसेदार शरीर यामुळे ते गोपाळ कृष्णासारखे दिसत. त्यामुळे त्यांच्या आईवडिलांनी त्यांचे नाव गोपाळ असेच ठेवले.

गोपाळचे वडील कृष्णराव आणि आई सत्यभामाबाई ही दोघे आपल्या शांत सुस्वभावी वर्तनामुळे सर्वांना हवीहवीशी वाटत. लहानश्या गोपाळावरही माता-पित्यांचे हे सुसंस्कार झाल्यामुळे तोही त्यांच्यासारखाच सुशील, विनम्र आणि शांत स्वभावाचा झाला.

गोपाळ शाळेत शिकत होता, तेव्हाची एक गोष्ट, एकदा गुरुजींनी एक उदाहरण गृहपाठासाठी दिले. दुसऱ्या दिवशी पाहतात तो सगळ्या विद्यार्थ्यांची उदाहरणे चुकलेली. एकटया गोपाळचे तेवढे बरोबर. गुरुजींना मोठे कौतुक वाटले. त्यांनी त्याला शाबासकी दिली; पण शाबासकी ऐकून गोपाळ फुशारून गेला नाही. उलट हुमसून रडू लागला. गुरुजींनी त्याच्या रडण्याचे कारण विचारले.

गोपाळने हुंदके देत देतच उत्तर दिले,

'गुरुजी, मी चुकलो. हे उदाहरण मी दुसऱ्याकडून सोडवून



आणले आहे!'

गुरुजींना आश्चर्य वाटले; पण गोपाळ खरे बोलला, याचे त्यांना समाधान अधिक झाले.

या एकाच प्रसंगात नव्हे, तर आयुष्यभर कुठल्याच प्रसंगात गोखल्यांनी खोटेपणा, लबाडी किंवा चहाडी केली नाही. असल्या

वा[illegible]ण्याची त्यांना मनोमन चीड होती. घृणा होती. ते एक श्रेष्ठ लो[illegible]कनेते झाले, ते यामुळेच,

गोखल्यांचे वडील कोल्हापूरजवळच्या कागल गावी कारकून होते, दहाव्या वर्षापर्यंत गोखले व त्यांचे बंधू गोविंदराव हे दोघे कागल येथेंच राहिले व शिकले; पण पुढे इंग्रजी शिकण्यासाठी त्यांना कोल्हापूरला ठेवण्यात आले. गोखल्यांच्या वडिलांची आर्थिक स्थिती चांगली होती असे नाही, तथापि मिळणाऱ्या पगारात काटकसरीने खर्च करावा व चार पैसे शिल्लक ठेवून नेकीने रहावे, अशी त्यांची वृत्ती. गोविंद गोपाळ यांनाही तीच सवय लागल्या-मुळे गरीबीतही ते कुटुंब सुखी असे. परंतु या सुखाला मधेच तडा गेला.

इ. स. १८७९ साली गोखल्यांचे वडील वारले. गोविंद-गोपाळ एकाएकी पोरके झाले. या वेळी गोविंद होता अठरा वर्षांचा. तर गोपाळ अवघ्या तेरा वर्षांचा, खरे तर ही वये म्हणजे खेळाच्या क्रीडांगणावर हुंदडण्याची; पण या दुर्दैवी भावांवर त्याच वयात आकाशाची कुऱ्हाड कोसळली. दोघेही बंधु हुषार होते. दोघांनाही शिकण्याची अपार उमेद होती. हौस होती. पण कृष्णराव एकटेच त्यांच्या कुटुंबात मिळवते होते व आता तर त्यांचा आधारच कोसळून पडलेला. तेव्हा दोघांपैकी कोणी तरी आता नोकरी करणे भागच होतें. त्यातल्या त्यात मोठा गोविंद. मग त्यानेच नोकरी करून आपले, आपल्या भावाचे व आईचे पोषण करायचे ठरविले. गोपाळच्या शिक्षणात खंड पडू द्यायचा नाही, त्याला पदवीधर करायचेच अशा जिद्दीने गोविंदराव कामाला लागले.

त्यांचा पगार तुटपुंजा होता, पण मन उदार होते. त्यामुळेच स्वतःच्या पोटाला चिमटा घेऊनही प्रतिमासी दहा रुपये ते आपल्या भावाला—गोपाळला पाठवीत. पुढे त्यांचे लग्न झाले. त्यामुळे खर्च वाढला. मग ते थोडेसे रागावत, म्हणत, 'गोपाळला म्हणावे, पुरे

आता तुझे शिक्षण. मी कंटाळलो. एकटा मनुष्य किती दिवस असा भार वाहणार?'– पण गोविंदरावांच्या पत्नी अत्यंत प्रेमळ व सहृदय होत्या. त्या लागलीच म्हणत, 'शिकू द्या भावजींना. मी माझा दागदागिना मोडून टाकीन हवे तर; पण त्यांचे शिक्षण थांबू द्यायचे नाही.' गोविंदरावांना हे ऐकून बरे वाटे. त्यांचाही राग तेवढाच असे. मग दोघे नवरावायको समाधानाने हसत आणि गोपाळचे शिक्षण चालूच राही.

अर्थात गोपाळलाही आपल्या बंधूच्या ओढाताणीची कल्पना होतीच. भावाने दिलेल्या पै-पैशाचा तो अगदी काटेकोर हिशोब ठेवीत असे. एक पैही वावगी खर्च करीत नसे. स्वतःला कधी नाटकाचा, काही खाण्याचा मोह झालाच, तर ते पैसे काहीतरी काम करून मिळवी.

अशा प्रकारें कष्ट सोसून व झटून अभ्यास करून तो वयाच्या पंधराव्या वर्षी मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाला.

## ध्येयवादी जीवन

मॅट्रिकनंतर गोपाळराव कोल्हापूरच्या राजाराम महाविद्यालयात प्रविष्ट झाले. राजाराम महाविद्यालय तेव्हा नवीनच सुरू झाले होते. त्यामुळे तिथे केवळ पहिल्या वर्षाचीच व्यवस्था होती. १८८२ मध्ये गोपाळराव तिथून पहिले वर्ष उत्तीर्ण झाले. अन् त्यांच्यापुढें प्रश्न उभा राहिला, की आता पुढचे शिक्षण कोठे घ्यावे? तथापि ते चिंता करीत बसले नाहीत. पुण्यात तेव्हा डेक्कन महाविद्यालय चालू होते. पण तिथे सगळे 'श्रीमंत बापाचे बेटे' शिकत. आणि गोपाळराव तर अत्यंत गरीबीत वाढलेले. तरी त्यांनी त्याच महाविद्यालयात नाव नोंदविले.. पहिली सहामाही तिथे काढली. एवढ्यात कोल्हापूरला दुसऱ्या वर्षाचीही सोय झाली होती. मग

दुसरी महामाही कोल्हापूरला काढून त्यांनी दुसरेही वर्ष पदरात पाडून घेतले.

गोपाळराव जात्याच हुशार, पण शिक्षणाची ही अशी परवड ? कोल्हापूरला दुसऱ्या वर्षानंतरची सोय नव्हती. पुण्याचे डेक्कन महाविद्यालय परवडणारे नव्हते. मग कुठे जायचे ? का शिक्षणाला पूर्णविराम द्यायचा ? छे ! छे ! असला अविचार करायचा नाही. संकटे कितीही येवोत, कष्ट कितीही सोसायला लागोत, पण शिक्षण सोडायचे नाही. कोल्हापूर नाही, पुणे नाही, तर मुंबईला जाऊ.

—आणि खरोखरच गोपाळराव १८८४ साली मुंबईला पोचले. तिथे त्यांनीं एल्फिन्स्टन महाविद्यालयात नाव घातले आणि त्याच वर्षी ते गणित हा ऐच्छिक विषय घेऊन बी. ए. झाले.

परंतु नुसत्या परीक्षा देणे, हे गोपाळरावांचे ध्येय नव्हते. आपण उत्तमपैकी इंग्लीश बोलावे आणि लिहावे, हा त्यांचा ध्यास होता. त्या ध्यासाने त्यांनी नामवंत इंग्रज ग्रंथकारांचे उतारेच्या उतारे, सुभाषितवजा वाक्ये, उत्कृष्ट शद्बसंपत्ती यांचा संग्रह केला. त्यांचे पाठांतर केले, मधमाशीं जसा मध गोळा करते, तसा कणाकणाने, क्षणाक्षणाने अविरतपणे त्यांचा हा उद्योग चालू होता. फर्डे इंग्रजी वक्तृत्व करून मुंबई हायकोर्ट दणाणून सोडावे, हे त्यांचे स्वप्न. या एकाच स्वप्नाने भारून जाऊन त्यांनी हे परिश्रम केले आणि त्याला फळही आले.

बी. ए. झाल्यावर त्यांची महत्वाकांक्षा आणखी उसळी घेऊ लागली. आय्. सी. एस्. व्हावे, असा एक विचार त्यांच्या मनात आला. पण त्या परीक्षेला खर्च फार. आजवर भावाने साहाय्य केले, हे त्याचे महादुपकार होते. आता आणखी त्याच्यावर बोजा घालणे बरे नव्हते, खरेही नव्हते. वकील होण्याची ईर्षा होती. तिथेही आर्थिक अडचणीचा अडसर होताच मग इंजिनियरिंगला जायचे ठरले. इंजिनिअरिंग महाविद्यालयात नाव नोंदवून तिथे

जायला सुरुवात देखील केली. एवढ्यात डेक्कन महाविद्यालयात वकिलीचा वर्ग निघाला. अन् गोपाळरावांच्या मनात 'इंजिनिअरिंग की वकिली' असे द्वंद्व सुरू झाले. त्यात वकिलाचा विजय झाला. गोपाळरावांनी इंजिनिअरिंग महाविद्यालय सोडून डेक्कन महाविद्यालयाचा रस्ता सुधारला.

वकिलीचा खर्च भागविण्यासाठी नोकरीचाही ते शोध घेऊ लागले. बी. ए. चीं पदवी हाती होती, तेव्हा सरकारी नोकरीही हात जोडून समोर उभी होती. पण गोखले पडले ध्येयवादी. पारतंत्र्याच्या पंकात रुतलेल्या स्वदेशबांधवांचा उद्धार करण्याचे कंकण बांधून ते उभे होते. आपल्या ध्येयाला साजेशी नोकरीच त्यांना हवी होती.

आणि तशी ती त्याना मिळालीही ! 'निबंधमाला' कार विष्णुशास्त्री चिपळूकर आणि न्यायमूर्ती रानडे हे दोन महापुरुष महाराष्ट्राच्या क्षितिजावर एखाद्या दैदीप्यमान ताऱ्यासारखे तेव्हा लखलखत होते. त्यांच्या तेजस्वी किरणांनी महाराष्ट्रातील शेकडो तरुणांना देशभक्तीची दीक्षा दिली होती. बळवंतरावाना टिळक गोपाळराव आगरकर हे नुकतेच पदवीधर झालेले दोन देशभक्त तरुण तर रानडे–चिपळूणकरांच्या प्रभावलयातच वावरत होते.

दि. १ जाने. १८८० रोजी संपूर्ण राष्ट्रीय वृत्तीचे शिक्षण देणारी एक इंग्रजी शाळा पुण्यात चिपळूणकर–टिळक–आगरकर या त्रिमूर्तींनी काढली. देशभक्तीच्या विचाराने भारलेले नवे पदवीधर स्वच्छेने, अल्प वेतनावरही या शाळेत शिक्षक म्हणून आले. गोपाळराव गोखले याला अपवाद नव्हते. तेही त्या 'न्यू इंग्लिश स्कूल' मध्ये अवघे ३५ रुपये मासिक वेतन घेऊन इंग्रजीचे शिक्षक म्हणून रुजू झाले. याच वेळी त्यांनी आपल्या मित्रासमवेत पब्लिक सर्व्हिस परीक्षेचा वर्ग सुरू केला. त्या वर्गातूनही त्यांना जवळजवळ ३५ रुपयेच मिळत.

आता आर्थिक परिस्थिती बरी होती. स्वतःला आवश्यक तितकाच खर्च करून उर्वरित पैसे बंधूकडे पाठवणे शक्य होत होते. शिक्षण आणि व्यवसाय मनासारखा मिळाला होता. त्यामुळे गोपाळराव सर्वार्थाने संतुष्ट होते.

इ. स. १८८५ साली ते वकिलीची परीक्षा उत्तीर्ण झाले. यापूर्वी १८७९ साली त्यांचा विवाह झाला होता; पण तो सुखावह झाला नाही. त्यामुळे वकील झाल्यानंतर १८८७ साली त्यांचा दुसरा विवाह झाला.

शाळेप्रमाणे ते नंतर फर्ग्युसन महाविद्यालयात शिकवू लागले. फर्ग्युसन महाविद्यालय हे न्यू इंग्लिश स्कूलच्या चालकांनीच चालविलेले होते. टिळक–आगरकरांचा आदर्श ठेवणारे गोखले त्यांच्याबरोबर तिथेही काम करू लागले.

## सार्वजनिक जीवन

प्रारंभापासूनच गोखल्यांचे विचार मवाळ, स्वभाव शांत, पण निश्चयी. त्यामुळे न्यू इंग्लिश स्कूलमध्ये काम करायला सुरुवात केल्यावर ते आपल्या विचारांचा, सर्वस्वी आपल्या स्वभावाशी मिळेल असा सहकारी शोधू लागले. कारण चिपळूणकर काय किंवा टिळक काय, फारच तेजस्वी व्यक्तिमत्वाचे आणि प्रभावी विचाराचे महापुरुष. त्यांची प्रखरता गोखल्यांना सहन होणे दिवसेंदिवस अशक्य झाले त्यातल्या त्यात गोपाळराव आगरकर त्यांना समस्वभावी व समविचारी वाटले.

पुढे ते केसरी–मराठ्यात लेखही लिहू लागले. शाळेत महाविद्यालयात ते किती आस्थेने व तन्मयतेने शिकवीत, त्याचे एक उदाहरण सांगतात.

एकदा ते नेल्सनचे चरित्र शिकवीत होते. त्यासाठी त्यांना

जहाजांच्या अंगोपांगांची माहिती हवी होती. गोखले तर त्या विषयात अनभिज्ञ. पण काही तरी करून वेळ मारून नेणे त्यांच्या स्वभावात नव्हते. ते तडक मुंबईला गेले. तिथे त्यांनी सर्व माहिती मिळविली व मगच विद्यार्थ्यांना ते चरित्र शिकवले.

इ. स. १८८५ साली पुण्याच्या हिराबागेत एक सभा भरली होती. न्या. रानडे त्या सभेत वक्तें होते. गोखल्यांनी त्यांची कीर्ती ऐकली होती, पण त्यांना प्रत्यक्ष पाहिलें नव्हते. या सभास्थानी गोखले स्वयंसेवक होते. न्यायमूर्ती रानडे तिथें आलें, तेंव्हा गोखल्यांनी त्यांना प्रवेश नाकारला. रानडे शांतपणे तिथेच उभें राहिले. गोखल्यांच्या दक्षतेचे त्यांना कौतुक वाटलें. थोड्या वेळाने सभासंचालक बाहेर आले व रानड्यांना घेऊन आत गेले, मग गोखले अवाक् होऊन पाहत राहिले. भावी काळात ज्याना त्यांनी गुरु केलें त्या रानड्याना प्रथम भेटीत त्यांनी ओळखलेंही नव्हतें!

उणी पुरी बारा वर्षे—पूर्वीच्या भाषेत बोलायचे तर एक तप गोखले रानडे यांच्याबरोबर राहिले—वावरले. या बारा वर्षांत विद्वत्ता, शांतता, सौजन्य, सभ्यता, श्रद्धाळूपणा, दयाळूपणा इत्यादी अनेकविध सद्गुण गोखल्यांना पाहायला मिळाले आणि प्राजक्ता च्या झाडाखाली उभे राहून त्याची सुगंधी पुष्पे गोळा करावी, तशा अधीरतेने आणि उत्कटते गोखल्यांनी या साऱ्या सद्गुणांचा संचय करून घेतला.

सार्वजनिक जीवनात कसे वागावे, कसे बोलावे, आपले विचार कसे लिहावे व लोकांना पटवून द्यावे, इ. किती तरी बाबतीत रानड्यांनी गोखल्यांना पद्धतशीर मार्गदर्शन केले. गोखलेच आपले खरे शिष्य आहेत, अशा वृत्तीने ते वागत.

पुण्यात एक 'सार्वजनिक सभा' नावाची संस्था होतीं. रानड्यांनी गोखल्यांना तिचे चिटणीस बनविले. इ. स. १८९० तें १८९६ अशी ६–७ वर्षे गोखल्यांनी ते काम केले आणि रानड्याकडून

शास्त्रासकी मिळवली. सभेचे एक त्रैमासिक होते व ते समाजात सरकारात नावाजलेले होते. त्याच्या २७ अंकात एकूण ४९ लेख गोखल्यांनी लिहिले. हे लेख अत्यंत माहितीपूर्ण, युक्तिवादयुक्त आणि काटेकोर शब्दयोजनेनें संपन्न असत. रानडयांची प्रशस्ती म्हणजें पृथ्वीमोलाचे पारितोषिक अशी गोखल्यांची श्रद्धा असे.

कलकत्त्याच्या काँग्रेसमध्ये गोखले हिंदुस्थानचे भावी नेते आहेत, अशा शब्दांत त्यांच्या यशाची रानडयांनी ग्वाही दिली. गोखले तेव्हा अवघे चोवीस वर्षांचे होते. कलकत्त्याच्या काँग्रेस मध्येच त्यांनी आपले प्रथम भाषण केले ते भाषण मुद्देसूद, छोटेसे पण परिणामकारक होते.

यानंतर गोखल्यांच्यावर एक मानहानीचा प्रसंग आला. हिंदुस्थान मधील उत्पन्न व तिथला खर्च याविषयी चौकशी करण्यासाठी इंग्रज सरकारने एक समिती नेमली. तिचे नाव वेल्बी कमिशन. या कमिशनपुढे डेक्कन सभेच्या वतीने साक्ष देण्यासाठी गोखल्यांना विलायतेत पाठविण्यात आले. गोखल्यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण व यथायोग्य असे विवेचन करून आपले म्हणणे कमिशनला सादर केले.

या वेळी पुण्यात प्लेगची आपत्ती उद्‌भवली. तेव्हा सोजिरांनी पुण्यात भयंकर अत्याचार केले. गोखल्यांच्या स्नेह्यांनी त्याचा वृत्तांत गोखल्यांना इंग्लंडमध्ये कळविला. स्वाभाविकच गोखले इंग्रजाच्या या जुलुमावर संतापून उठले. त्यांनी तिथल्या 'मँचेस्टर गार्डियन' नामक वृत्तपत्रात एक पत्र प्रसिद्ध करून त्यात सोजिरांचे अत्याचार साग्रसंगीत वर्णन केले व सरकारवर सणसणीत टीका केली. त्यामुळे वातावरण प्रक्षुब्ध झाले. सरकारने गोखल्यांना आरोप सिद्ध करायला सांगितले. पण ज्यांनी त्याना प्रथम पत्रे पाठविली, ते लोक आता पुढे आले नाहीत. आरोप सिद्ध न करता आल्यामुळे गोखल्याना माफी मागावी लागली!

## शुरतेचे अपयश

इ. स. १८९९ साली गोखले मुंबईच्या विधिमंडळात निवडून गेले त्यामुळे त्याना लोकांच्या मागण्या व अडचणी सरकारच्या कानावर घालणे सुलभ झाले. कोणतीही योजना असो, तीत लोकाचे हित किती आहे व कसे होईल याकडे गोखल्यांची प्रथम दृष्टी असे. जिथे शक्य असेल व आवश्यक असेल तिथे, सरकारचे निर्भिड भाषेत वाभाडे काढल्याशिवाय राहात नसत तथापि त्यांची भाषा सभ्यतेचे उल्लंघन करीत नसे. त्यामुळे समाज व सरकार अशा उभय पक्षात त्यांच्याविषयी आदर असे सरकारने त्यांच्या संसदीय कामगिरीचा गौरव म्हणून त्यांना सी. आय. ई. ही बहुमानाची पदवी बहाल केली.

मुंबईप्रमाणे च दिल्लीच्या संसदेचे सदस्यत्व, मुंबई विद्यापीठाची फेलोशिप (उपप्राध्यापकपद आणि पुणे नगरपालिकेचे अध्यक्षपद ही अधिकारस्थानेही गोखल्यांना हळू हळू प्राप्त झाली.

पण या वाढत जाणाऱ्या कीर्तिवलयाबरोबर वादाची वादळेही त्यांच्या सार्वजनिक जीवनात उठू लागली.

रानडे चिपळूणकर– टिळक– आगरकर ही गोखल्यांची आदर-स्थाने. पण त्यांना जवळचे वाटले ते चिपळूणकरांपेक्षा रानडे आणि टिळकांपेक्षा आगरकर. 'आधी सामाजिक की आधी राजकीय आणि आपले अधिकार लढून मिळवायचे की अर्ज विनंत्या करून असे दोन मतप्रवाह तेव्हाच्या सुशिक्षितांमध्ये होते. आधी-सामाजिक सुधारणा कराव्या व जे काही मिळवायचे ते अर्ज विनंत्या करून असे म्हणणाऱ्या पक्षाचे नेते होते रानडे –आगरकर. आणि प्रथम देशच मुक्त केला पाहिजे, राजकीय सुधारणाच मिळवल्या पाहिजेत व त्याही लढल्याशिवाय-भांडल्याशिवाय मिळणार नाहीत, या मतप्रवाहाचे अध्वर्यू होते चिपळूणकर टिळक.

गोखल्यांचा स्वभाव सनदशीर मार्गाने जाणारा. त्यांनी रानडे आगरकरांना आपले नेते मानून त्यांच्या बाजूने काम करायला सुरुवात केली. पण लोकांचा पाठिंबा होता टिळकांना. टिळकांची घनगंभीर मूर्ती, त्यांची लढाऊ भाषा, तळपत्या तलवारीसारखी लेखणी फिरण्याचे कौशल्य, सुस्पष्ट विचार, साहसी वृत्ती इ. गोष्टीमुळे ते लक्षावधी भारतीयांच्या हृदयसिंहासनावर आरूढ होऊ पहात होते. त्यांच्या कडकडाटापुढे रानडेपक्षाची शांत, सौम्य भाषा लोकांना कशीतरीच वाटे. त्याचा परिणाम म्हणजे जागो जागच्या सार्वजनिक संस्था टिळकपक्षाचे लोक काबीज करीत सुटले.

पुण्याची सार्वजनिक सभा टिळकांनी अशीच जिंकली. त्यामुळे गोखल्यांना नवी डेक्कन सभा स्थापन करावी लागली. चिपळूणकरांच्या मृत्यूने आगरकरांच्या त्यागपत्राने केसरी–मराठा ही पत्रेही टिळकांच्या मालकीची झाली गोखले आगरकरांच्या 'सुधारका'त लिहू लागले, पण केसरी–मराठ्याच्या तोफखान्यापुढे सुधारकाची सनई काय वाजणार !

टिळकांच्या व त्यांच्या पक्षाच्या या सर्वत्र वाढत जाणाऱ्या प्रभावामुळे गोखले नाउमेद झाले. अर्थात स्वस्थ बसणे त्यांच्या रक्तातच नव्हते. सगळ्या संस्था टिळकांनी जिंकल्या, आता काँग्रेस तरी आपण आपल्या हाती ठेवावी, या उद्देशाने गोखल्यानी मवाळ पक्षाची भक्कम संघटना बांधली. परंतु १९०७ साली सुरतेला जे काँग्रेसचे अधिवेशन झाले, त्यात मवाळ पक्षाचा साफ धुव्वा उडून अखेर काँग्रेस जहालांच्या म्हणजे टिळकांच्या हाती गेली.

सुरतेची काँग्रेस म्हणजे कुरुक्षेत्र ठरले. गोखल्यांच्या नेमस्त पक्षाने एक अध्यक्ष निवडले. ते अर्थात टिळकांना व त्यांच्या पक्षाला अमान्य होते. टिळक आपला विरोध नोंदवायला व्यासपीठावर

चढले म ग, मवाळ पक्षीयांनी एकदम दंगल उगळून दिली. टिळकां-वर खुर्च्या, जोडे फेकण्याचा प्रयत्न झाला. पण टिळक खंबीर. ते छातीवर हात ठेवून निर्भयपणे उभे राहिले. गोखल्यांनी प्रसंगाचे गांभीर्य तेव्हाच ओळखले. टिळकांवर हल्ला होणे म्हणजे सबंध हिंदुस्थानचा रोष ओढवून घेणे आणि मग त्या अग्नीत मवाळ पक्ष नित्याचा जळून जाणे. ! असला अघोरी प्रकार गोखल्यांना कधीच नको होता. शिवाय दंगल, मारामारी हे प्रकार त्यांच्या सौजन्यशील स्वभावाच्या नेमके विरूद्ध होते. आणि टिळकांशी गोखल्यांचा मतभेद होता, वैर नव्हते. टिळकांच्या देशभक्तीविषयी आणि प्रभावी कर्तृत्वाविषयी त्यांच्या मनात निरतिशय आदर होता.

अशा स्थितीत टिळकांवरील हल्ला त्यांना सहन होणे मुळीच शक्य नव्हते. त्यांनी टिळकांच्यापुढे उभे राहून लोकांचा हल्ला परतविला. ते निश्चयाने गरजले--'टिळकांच्या एका केसालाही धक्का लागला, तर इथे रक्तपात होईल. ही दंगल ताबडतोब थांबवा.'

—आणि दंगल थांबली. गोखल्यांच्या शब्दांना यश आले. पण कांग्रेस उधळली गेली व नंतर ती सरळसरळच टिळकपक्षाने काबीज केली.

## उपेक्षेच्या अंधारात

गुरतेचे अपयश गोखल्यांना अतिशय तापदायक ठरले. कांग्रेस-मध्ये त्यांना व त्यांच्या पक्षाला काहीच स्थान उरले नाही. सर्वत्र टिळकांच्याच कीर्तीच्या दुंदुभी वाजू लागल्या. त्यामुळे टिळकांचा जहाल पक्ष मध्यान्हीच्या सूर्यासारखा देशभर तेजाने तळपू लागला. हे तेज इतके दाहक अन् इतके डोळे दिपवणारे होते, की थोड्याच दिवसात 'ज्यांच्या राज्यावर सूर्य कधीही मावळत नाही,'

अशा इंग्रज सत्ताधाऱ्यांनाही ते सहन होईनासे झालें. अर्थात याचा परिणामही निश्चितच होता. सरकारने एकाएकी टिळकपक्षीय नेत्यांची धरपकड आरंभली. 'काळ' कर्ते शिवरावपंत परांजपे यांच्यावर सरकारने भरलेल्या खटल्यात त्यांना मदत करावी या उद्देशाने टिळक मुंबईला गेले, तोच खुद्द टिळकांवरच सरकारने झडप घातली व त्यांना सहा वर्षे काळ्या पाण्यावर पाठविण्यात आले.

अशा प्रकारे लो. टिळकांना लोकांच्या डोळ्यांसमोरून हलवून दूर अंधारकोठडीत डांबल्यामुळे जहालपक्षाचे सामर्थ्य कमी होईल, अशी सरकारची कल्पना होती. थोड्याफार फरकाने गोखल्यांच्या मवाळ पक्षालाही असेच वाटत असावे. तथापि गोखल्यांना मात्र असे वाटले नाही. सुरतेच्या अपयशानंतर ते एक प्रकारे अंतर्मुख बनले होते. आपण आपल्या क्षेत्रात प्रामाणिकपणाने व निरलसपणाने काम करीत राहावे, मग त्याचे फळ आपल्याला मिळो वा न मिळो, अशी त्यांची वृत्ती बनून गेली होती.

देशात सर्वत्र प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे करावे याविषयी त्यांनी सरकारपुढे एक बील मांडले. तथापि सरकारने त्यावर काहीही मत प्रकटन केले नाही अथवा हालचालही केली नाही. याप्रसंगी मोठमोठ्या इंग्रज मुत्सद्यांनी त्यांच्या वक्तृत्वाची खूप वाखाणणी केली, पण त्यांच्या मागणीला मात्र नकारघंटाच वाजवली. अशा वेळी गोखल्यांचे मन निराशेने ग्रासून जाई. त्यांना सरकारचा रागही येई. परंतु थोड्याच वेळाने त्यांच्यातील उपजत सौजन्यभाव उसळून वर येई व ते उत्साहाने म्हणत, 'ठीक आहे! आज नाही तर उद्या आमच्या विरोधाचा परिणाम निश्चित होईल आणि राज्यकारभारात सुधारणा घडून येतील.'

अर्थात वारंवार सरकारची मनधरणी करूनही अपयश आले. की ते संतापत व म्हणत, 'समंजस माणसांचा हा सल्लाही सरकार जर

असा धुडकावून लावणार असेल आणि आमच्या देशबांधवांना जनावराप्रमाणे वागविण्याचा हेकाच चालू ठेवणार असेल, तर या सरकारशी कोणतेच सहकार्य करणे शक्य होणार नाही.

गोखल्यांसारख्या सौम्य व सौजन्यशील नेत्याच्या शब्दांनाही जेव्हा अशी कडवट चव येऊ लागे, तेव्हा इंग्रज सरकार काही किरकोळ सुधारणा जाहीर करीत असे व मग गोखले पुन्हा सरकारशी साहाय्य व सहकार्य करायला सिद्ध होत. हे असे वर्षानुवर्षे चालले होते. मांजराने उंदराला खेळवावे, तशा पद्धतीची ही इंग्रजांची नीती होती. गोखल्यांनाही त्यातला फोलपणा कळत होता. तथापि एवढ्या तेवढ्याने पेटून उठणे, भडकून जाणे त्यांच्या स्वभावातच नव्हते. त्यांचा स्वभाव शांत, स्निग्ध चांदणे वरमत राहणाऱ्या चंद्रासारखा होता. पौर्णिमेकडे जाताना उल्हासणारा अन् अमावस्येकडे येताना काळंजून जाणारा !

आपल्यासारखेच शांत स्वभावाचे, सातत्याने परिश्रम करणारे व देशावर नितांत भक्ती ठेवणारे असे सहस्रवधी देशभक्त तरुण राष्ट्रकार्यार्थ सिद्ध व्हावे, ही गोखल्यांची आकांक्षा होती. त्या दृष्टीनेच त्यांनी भारत सेवक समाजाची स्थापना केली. दि. १२ जून १९०५ हा त्या संस्थेचा स्थापन दिन. त्यादिवशी गोखल्यांचे एक स्वप्न साकार झाले

## भारत सेवक समाज

पुणे येथे फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मागे एक टेंकडी आहे. तिच्यावर उभे राहून गोखले यांनी सर्वश्री देवधर, द्रवीड आणि पटवर्धन या आपल्या सहकार्यांसह एका सकाळी समोरच्या क्षितिजावर उगवणाऱ्या सूर्याच्या साक्षीनें देशसेवेची शपथ घेतली. गोखल्यांची ती शपथ म्हणजे आजन्म आचरावयाचे व्रत होते.

त्यांचा मार्ग हा शांततेचा, सौजन्याचा आणि प्रेमभावाचा होता. केवळ स्वातंत्र्यसंपादन हेच त्या देशसेवकांचे साध्य नव्हते, तर समाजाची सर्वांगीण सेवा हेही त्यांना अपेक्षित होते. त्यामुळे कोणीही माणसाला स्वदेशाची सेवा करण्यासाठी भारत सेवक समाजाचे सदस्य होता येत असे व आपल्या आवडीनुसार कार्य करता येत असे. गोखल्यांनी स्थापन केलेल्या या संस्थेच्या ध्येय-धोरणाचा तत्कालीन नेत्यांवर आणि नंतरच्या अनेक नेत्यांवर इतका विलक्षण प्रभाव पडला, की लाला लजपतराय यांच्यासारख्या अनेक पुढाऱ्यांनी आपापल्या प्रांतांत भारत सेवक समाजासारख्या अनेक संघटना उभारल्या व त्यांच्याद्वारा लोकसेवेच्या अनेक कार्यांना चालना मिळाली. पूर आला, दुष्काळ पडला, अपघात घडले, भूकंप झाला किंवा आणखी काही निमित्ताने लोकांना मदतीची गरज लागली, की तत्काळ या भारत सेवकांचे पथक तिथे जाऊन उपस्थित होई व आपल्या कार्याला वेगाने प्रारंभ करी. त्यामुळे लोकांच्या मनात त्यांच्याविषयी खूपच विश्वास निर्माण झाला.

भारत सेवक समाजाचा सदस्य होणाऱ्या माणसाला पुढील शपथा घ्याव्या लागत

(१) माझ्या डोळ्यापुढे सदैव देशाच्याच कल्याणाची गोष्ट प्रथम राहील. माझ्यात जे जे काही उत्कृष्ट आहे ते ते सर्व मी आपल्या देशाच्या सेवेसाठीच समर्पण करीन.

(२) देशाची सेवा करताना स्वार्थाचा कोणताही विचार मी मनात येऊ देणार नाही

(३) सर्व भारतीय लोकांना मी माझे भाऊ असे समजेन आणि त्यांच्या उन्नतीसाठी धर्म, पंथ जात यांचा कोणताही विचार बाजूला ठेवून मी प्रयत्न करीन.

(४) माझ्या किंवा माझ्या कुटुंबासाठी समाज (भारत सेवक

समाज) जे काही द्रव्य देईल, त्यातच मी आनंद मानीन व समाधानाने राहीन. स्वतःसाठी याहून अधिक पैसा मिळविण्याच्या फंदात मी कधीच पडणार नाही.

(५) मी आपले खाजगी आचरण अत्यंत पवित्र ठेवीन.

(३) कोणाशीही कोणत्याही कारणावरून भांडणार नाही.

(७) भारत सेवक समाजाचे ध्येय सदैव मी डोळ्यासमोर ठेवीन. शक्य तितक्या कळकळीने व तळमळीने मी समाजाच्या अभिवृद्धीसाठी प्रयत्न करीन.

या सात शपथा म्हणजे एक प्रकारची सप्तपदीच होती. ही सप्तपदी झाली म्हणजे तो मनुष्य भारत सेवक समाजाचा सदस्य झाला. गोखल्यांनी या शपथा केवळ दुसऱ्यांकडूनच वदवल्या असें नव्हे तर ते स्वतः अगोदर त्याप्रमाणे वागले होते व शेवटपर्यंतही वागत राहिले.

द्रव्याचा मोह त्यांना कधीच नव्हता. सन्मानाच्या पदव्याही त्यांनी नाकारल्या होत्या. वृत्तीने ते उद्योगप्रिय होते. त्यांची देशभक्ती शंभर नंबरी होती.

## गांधीजींच्या शद्वात:

गोखले म. गांधीचे गुरू होते, हे सांगितलेच; त्यांच्याविषयी लिहिताना गांधीजीच्या शद्वांना जणू जाईचा सुगंध आला आहे. गांधीजी लिहितात–

"गोखले आपला एक क्षणही फुकट जाऊ देत नसत. त्यांचे बोलणे-चालणेही देशकार्यासाठी असे. त्यांच्या बोलण्यात मला कुठेही मलीनता, दंभ किंवा खोटेपणा आढळला नाही. हिंदुस्थानचे दारिद्र्य व पारतंत्र्य त्यांना प्रतिक्षणी सलत असे."

गांधीजीसारख्या त्या काळी सर्वस्वी नव्या असलेल्या नेत्याच्या साहाय्यार्थ गोखल्यांसारखा थोर पुरुष किती कष्ट घेत असतो हे

BVBK-0400387

सांगताना गांधीजी लिहितात

"एकदा मी कलकत्याहून काशीला निघालो होतो. मला निरोप देण्यासाठी गोखले स्वतः स्टेशनवर आले. तिथे त्यांनी माझ्या हाती एक डबा दिला. बेसनाचे लाडू आणि पुऱ्या होत्या."

## विसावली काया!

असे हे प्रेमळ आणि सरळ हृदयाचे गोखले अखेर आयुष्य-भरच्या श्रमाने थकून गेले. गांधीजींच्या आफ्रिकेतील सत्याग्रहाच्या साहाय्यासाठी म्हणून दि. २२ आक्टोबर १९१२ या दिवशी ते आफ्रिकेत गेले. त्याच वर्षीच्या नोव्हेंबर महिन्यात ते आफ्रिकेतून परतले व पाठोपाठ इंग्लंडला गेले. एकसारख्या प्रवासाने त्यांच्या प्रकृतीवर ताण पडला व ते इंग्लंडातच १९१४ साली आजारी पडले. यामुळे त्यांना आपला पुढचा सर्व कार्यक्रम आवरता घेऊन हिंदुस्थानात परत यावे लागले. तथापि त्यांच्या प्रकृतीला आराम पडला नाही. दिवसेंदिवस त्यांनी मृत्यूची चाहूल ऐकू येऊ लागली एके दिवशी मध्यरात्रीच त्यांना आपले सन्मित्र कादंबरीकार हरिभाऊ आपटे यांना बोलावून आणले. हरिभाऊ आले. आणखीही आप्तमित्र आले. मग गोखले म्हणाले, 'मला एखाद्या आरामिकेवर बसवा.' त्याप्रमाणे गोखल्यांना आरामखुर्चीवर बसविण्यात आले, तेंव्हा ते प्रसन्न हसले आणि म्हणाले, 'या लोकीची मजा पाहिली आता त्या लोकची पाहू.'

त्यानंतर गोखले बोलले नाहीत, की हलले नाही. त्यांनी शांत मनाने आणि संपूर्ण समाधानाने या लोकीचा निरोप घेतला होता. उणेपुरे अर्धे शतक या देशासाठी झिजलेली त्यांची चंदनी काया मृत्यूच्या मांडीवर विसावली होती. त्यांच्या कार्याचा सुगंध मात्र दशदिशात दरवळतो आहे!

वाचनालय

# नामदार गोखले यांचा जीवनपट

१८६६ ९ मे, रत्नागिरी जिल्ह्यातील कोतळूक या खेडेगावी जन्म

१८७१ कोल्हापूरजवळ कागल येथे प्राथमिक शिक्षण सुरू.

१८७९ वडिलांचा स्वर्गवास. १८८० पहिला विवाह.

१८८१ मॅट्रिक परिक्षा उत्तीर्ण. १८८४ बी. ए. परीक्षा उत्तीर्ण.

१८८५ न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षकाची नोकरी व त्याच वर्षी एल्. एल्. बी. परीक्षा उत्तीर्ण.

१८८७ दुसरा विवाह व सुप्रसिद्ध 'गोखल्यांचे अंकगणित' प्रसिद्ध.

१८८८ ते १८९६ सार्वजनिक कामे. 'सुधारका'चे इंग्रजी आवृती-चे संपादक. मुंबई प्रांतिक परिषद, सार्वजनिक सभा, मुंबई राष्ट्रीय सभा इ. संस्थेत प्रत्यक्ष कार्य.

१८९६ म. गांधींशी प्रथम भेट.

१८९७ वेल्बी कमिशनपुढे साक्ष व माफी प्रकरण.

१८९८ पुणे नगरपालिकेवर निवड.

१८९९ मुंबई विधिमंडळाचे सदस्य.

१९०० दुसऱ्या पत्नीचा मृत्यू.

१९०१ गुरु. न्या. रानडे यांचे निधन.

१९०२ पुणे नगरपालिकेचे अध्यक्ष.

१९०४ सी. आय्. ई. पदवी प्राप्त.

१९०५ भारत सेवक समाजाची स्थापना.

१९०७ सुरतेची कॉंग्रेस व गोखले पक्षाचा पराभव.

१९०८ रानडे अर्थशास्त्र संस्थेची स्थापना.

१९१० सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा आग्रह करणारा ठराव मांडला.

१९१२ द. आफ्रिकेत बिनसरकारी वकील म्हणून नेमणूक.

१९१३ पब्लिक सर्व्हिस कमिशनसाठी इंग्लंडमध्ये.

१९१४ के. सी. आय. ई. या सरकारने देऊ केलेल्या पदवीला नकार.

१९१५ १९ फेब्रुवारी, पुणे येथे निधन.

□ □